दूरध्वनी क्र. (0721)2662090/
2662593/2662680 (वैयक्तिक)
हॅलो फॉरेस्ट (नि:शुल्क) 1926/

# महाराष्ट्र शासन (वन विभाग)
# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती यांचे कार्यालय
**कॅम्प परिसर, अमरावती - 444602**

Email ID- ccftamravati@mahafortest.gov.in / aticcfa@gmail.com

**आदेश क्रमांक :** 279 **दिनांक :** 21/03/2023

**विषय :** वनरक्षक संवर्गातून वनपाल संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देणेबाबत.

**संदर्भ :** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब, दिनांक 07/05/2021

वनरक्षक पदावरुन वनपाल पदावर खूल्या प्रवर्गात तात्पूरती पदोन्नती देण्याकरीता विभागीय पदोन्नती समितीची सभा दिनांक 18/11/2022 रोजी घेण्यात आली होती. विभागीय पदोन्नती समितीच्या सभेत पदोन्नतीस पात्र ठरविण्यांत आलेल्या वनरक्षकांना दिनांक 21/03/2023 रोजी पार पाडलेल्या नागरी सेवा मंडळाने पदस्थापनेच्या बाबतीत केलेल्या शिफारसीस अनूसरुन वनपाल पदावर खूल्या प्रवर्गात तात्पूरते पदोन्नतीचे आदेश खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

पात्र वनरक्षकांना मर्यादीत विभागीय स्पर्धा परिक्षा कोट्यातील रिक्त असलेल्या पदावर वनपाल संवर्गात तात्पूरती पदोन्नती खालील अटि व शर्तींच्या अधिन राहून वनपाल संवर्गात सूधारीत वेतन संरचनेनूसार वेतन स्तर (एस-8: 25500-81100) या वेतनमानात वनपाल या पदावर खाली नमूद केलेल्या अटीवर निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

1. पात्र वनरक्षकांना देण्यात येणारी पदोन्नती ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब, दिनांक 07/05/2021 च्या निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे. उक्त पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनूमती याचिका क्रमांक 28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील. तसेच सदर पदोन्नती वनपाल संवर्गातील काही दावे/याचिका दाखल केल्या/झाल्या असल्यास सदर प्रलंबित याचिकांच्या अंतिम निर्णयाचे अधिन राहतील.
2. वनपाल संवर्गाच्या सर्व सेवा शर्ती संबंधितांना बंधनकारक राहतील.
3. सदर कर्मचारी यांची पदोन्नती ही वनरक्षक संवर्गाच्या अंतिम जेष्ठतेच्या व त्यामध्ये होणाऱ्या बदलांच्या अधिन राहील व या पदोन्नतीमूळे त्यांना देण्यात आलेली तात्पूरती पदोन्नती ही कोणत्याही पूर्व सूचना वा नोटीस न देता रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.
4. सदरची पदे मर्यादीत कोट्यातील असल्याने पदोन्नत वनपालांना तात्पूरती पदोन्नती देण्यात येत असल्याने त्यांची नियमित पदोन्नती होईस्तोवर त्यांना वनपाल पदावरील जेष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.
5. सदर कर्मचारी यांची पदोन्नती 50/55 किंवा 30 वर्षाच्या अहर्तकारी सेवेनंतर पूर्नविलोकनाच्या निर्णयाच्या अधिन राहील.
6. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एस.आर.व्ही-2015/प्र.क्र.01/65/12, दिनांक 08.06.1995 अन्वये, कालबध्द पदोन्नती व शासन निर्णय क्रमांक वेतन-1999/प्र.क्र.02/92/सेवा-03, दिनांक 20.07.2001 अन्वये, आश्वासित प्रगती योजना शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आली आहे. तसेच शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-1119/प्र.क्र.3/2019/सेवा/02/03/2019 अन्वये सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सूधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेनूसार, 10 वर्षाच्या नियमित सेवेनंतरची सूधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेतलेला आहे. अशा कर्मचाऱ्यांनी पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेल्या कालबध्द पदोन्नतीचा किंवा सूधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ काढून घेण्यात येईल.
7. या आदेशाद्वारे पदोन्नत करण्यात आलेले कर्मचारी ज्या तारखेला पदस्थापना दिलेल्या ठिकाणी रुजू होतील त्या तारखेला त्यांची पदोन्नतीचे पदावर वेतन निश्चिती करण्यात येईल. तथापी ज्या कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत किंवा सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वनपाल या पदाची या संवर्गाची वरीष्ठ वेतन श्रेणी आधीच लागू करण्यात आली असेल त्यांची पुन्हा वेतन निश्चिती करण्यात येणार नाही.
8. सदर आदेश प्राप्त होण्यापूर्वी ज्या कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असेल अथवा त्यांना निलंबनाखाली ठेवण्यात आले असेल तर सदर कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश लागू राहणार नाही.

9. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक वशिअ-1214/प्र.क्र.26/11, दिनांक 02/06/2014 अन्वये त्या-त्या वर्षाची मालमत्त विवरण पत्रे सादर केली असणे ही राज्य शासनामधील सर्व टप्प्यांवरील, पदोन्नती, सेवा अंतर्गत आ.प्र.योजने अंतर्गतच्या पदोन्नती, प्रतिनियुक्ती, विदेश दौरा यासाठी पूर्व अट म्हाणून विहीत करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील सुचनानूसार **उपरोक्त वनरक्षक यांचेकडून आधी दिनांक 31/03/2022 रोजीचे मालमत्ता विवरणपत्र प्राप्त करुन घेतल्याची खात्री करुनच पुढील आदेश निर्गमित करण्याची दक्षता संबंधित कार्यालय प्रमुखांनी घ्यावयाची आहे.**

10. **कार्यालय प्रमुख यांना सूचीत करण्यात येते की, त्यांनी पदोन्नतीकामी सादर केलेल्या माहितीच्या आधारे खालील वनरक्षक यांना तात्पूरती पदोन्नती देण्यात येत असून, हे आदेश निर्गमित होई पावेतो एखाद्या कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी सूरु अथवा प्रस्तावित असल्यास त्यांचे पुढील आदेश न काढता याबाबत या कार्यालयास तात्काळ अवगत करण्यात यावे.**

11. शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.एसआरव्ही-2015/प्र.क्र.303/का-12, दिनांक 12/09/2016 अन्वये, वरच्या संवर्गात पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर पदोन्नती नाकारणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नांव निवड यादीतून काढून टाकण्यात येईल व पुढील दोन वर्ष होणाऱ्या निवडसुचीमध्ये संबंधित कर्मचाऱ्याचा विचार करण्यात येणार नाही.

12. संबंधित वनरक्षकाकडून वर नमूद केलेल्या अटी मान्य असल्याबाबत बंधपत्र संबंधित विभागाने प्राप्त करुन त्यांचे सेवापूस्तकास लावण्यात यावे.

| अ. क्र. | वनरक्षकाचे नाव (सर्वश्री) | कार्यरत विभाग | वनरक्षक नियुक्ती प्रवर्ग | वनपाल पदावर पदोन्नतीचा निवड प्रवर्ग | वनपाल पदावर निव्वळ तात्पुरत्या पदोन्नती नंतरची पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | दिपक पंडीत सपकाळे | अकोला वनविभाग, अकोला | वि.मा.प्र. | खुला | वनपाल, वरवट बकाल वर्तुळ, सोनाळा परिक्षेत्र, आकोट वन्यजीव विभाग, आकोट | रिक्त पदावर |
| 2 | प्रविण भानुदास निर्मळ | गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा | इ.मा.व. | खुला | वनपाल, विशेष सेवा वडाळी, परिक्षेत्र वडाळी, अमरावती वनविभाग, अमरावती | रिक्त पदावर |
| 3 | सै.करीम.सै.हुसेन | विभागीय वन अधिकारी, सा.व.वि.अमरावती | खुला | खुला | वनपाल, सावरपाणी वर्तुळ, अंजनगाव परिक्षेत्र, मेळघाट प्रादेशिक विभाग, परतवाडा | रिक्त पदावर |
| 4 | निलेश अर्जुन करवाडे | अकोला वन्यजीव विभाग, अकोला | अ.जा. | खुला | वनपाल, मोताळा वर्तुळ, मोताळा परिक्षेत्र, बुलढाणा वनविभाग, बुलढाणा | दिनांक 31/03/2023 रोजी श्री.व्हि.बी. भोसले, वनपाल यांचे सेवानिवृत्तीने रिक्त होणाऱ्या पदावर |
| 5 | अभिजीत मुरलीधर बगळे | अमरावती वनविभाग | इ.मा.व. | खुला | वनपाल, पाडळी वर्तुळ, बुलढाणा परिक्षेत्र, बुलढाणा वनविभाग, बुलढाणा | दिनांक 31/03/2023 रोजी श्री.एस.एस.सोळंके, वनपाल यांचे सेवानिवृत्तीने रिक्त होणाऱ्या पदावर |
| 6 | रविंद्र धन्नुजी महल्ले | मेळघाट वन्यजीव विभाग, परतवाडा | अ.ज. | खुला | वनपाल, सेमाडोह संकुल, सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा | रिक्त पदावर |

सदर आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येतील. संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी उक्त शासकीय सेवकांना त्यांचे पदोन्नतीने पदस्थापनेच्या जागेवर रुजू होणेसाठी स्थानिक व्यवस्था करुन अ.क्र.1,2,3 व 6 वरील संबंधित वनरक्षकांना तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच, अ.क्र.4 व 5 समोर नमूद वनरक्षक यांना दिनांक 31/03/2023 रोजी मध्यान्होत्तर कार्यमुक्त करावे. संबंधितांचा कार्यमुक्त व रुजू दिनांक या कार्यालयास विनाविलंब कळवावा. तसेच, कार्यमुक्त दिनांकानंतर जे पदोन्नतीने पदस्थापना होण्यापूर्वी ज्या ठिकाणी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन त्यांचे वेतन अथवा कोणतेही देयके अदा करु नयेत.

पदोन्नतीने पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होणेकरीता कार्यमुक्त केल्यानंतर जर संबंधित कर्मचारी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होत नसेल तर, अशा कर्मचाऱ्यांविरुध्द सक्षम प्रधिकारी यांनी नियमानूसार शिस्तभंगाची कार्यवाही हाती घ्यावी व त्याबाबत या कार्यालयास अवगत करावे. **पदोन्नतीने पदस्थापना ही संपूर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे कोणत्याही कर्मचाऱ्याने पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणेबाबत राजकीय दबाव आणल्यास त्यांनी म.ना.से.(वर्तणूक) नियम 1981 मधील नियम क्र.23 चा भंग केला असे समजून सदर कृती शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहील.**

(जी.के.अनारसे)
**मुख्य वनसंरक्षक**
**(प्रादेशिक), अमरावती**

कक्ष-8/आस्था/TN-1/पदोन्नती/व.र. ते वनपाल/ 3492 /2022-23
अमरावती-2, दिनांक : 21/03/2023

**प्रति,**

**वरील प्रमाणे (सर्व) वनरक्षक,**
**मार्फत- संबंधित नियंत्रण अधिकारी**

**प्रतिलीपी** : अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

**प्रतिलीपी** : मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेव्याप्र, अमरावती यांना माहितीस सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलीपी** : वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त कार्यालय, अमरावती यांना माहितीस अग्रेषित.

**प्रतिलीपी** : उपवनसंरक्षक, अमरावती वनविभाग/अकोला वनविभाग/बुलढाणा वनविभाग/सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा/मेळघाट प्रादेशिक विभाग, परतवाडा/आकोट वन्यजीव विभाग/गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, संबंधित कर्मचाऱ्यास कायमुक्त/रुजू करुन तसा अहवाल सादर करावा.

**प्रतिलीपी** : विभागीय वन अधिकारी, मेळघाट वन्यजीव विभाग, परतवाडा/अकोला वन्यजीव विभाग, अकोला/ सामाजिक वनीकरण विभाग, अमरावती यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, संबंधित कर्मचाऱ्यास कायमुक्त/रुजू करुन तसा अहवाल सादर करावा.

**प्रतिलीपी** : **आदेश फाईल.**